मौजे मौदा, (ता.मौदा, जि.नागपूर) या नळ पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः क्र. सुप्रमा १११४/प्र.क्र.३१०/पापु १३
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई-४०० ०३२
तारीखः ४ फेब्रुवारी,२०१६

वाचा -

१) शासन निर्णय क्र.ग्रापापु-२०११/प्र.क्र.३६१/पापु-१३, दि.२४/०२/२०१२
२) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.मजीप्रा/मनिसंवकक्ष/ग्रामीण/सीआर-३२५/९२३, दि.०७/१०/२०१४
३) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे आदेश क्र.मजीप्रा/मुअ(ना)/तांशा-२/८७५/१५, दि.२८/०९/२०१५.
४) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.मजीप्रा/मुअना/तांशा-२/१३३९/२०१५, दि.२७/११/२०१५.

प्रस्तावना -

मौजे मौदा (ता.मौदा,जि.नागपूर) नळ पाणी पुरवठा योजनेच्या **रु.१४,५१,९६,०७९/- (ढोबळ)** किमतीच्या अंदाजपत्रकास संदर्भीय क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मुळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापी योजनेच्या खर्चात काही अपरिहार्य कारणामुळे वाढ झाली. त्यामुळे सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी प्रस्तुत नळ पाणी पुरवठा योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्र क्र.२ अन्वये शासनास सादर केला होता. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी प्रस्तुत योजनेच्या **रु. २०,४२,६१,२६८/-(ढोबळ)** किंमतीच्या प्रस्तावास सुधारीत तांत्रिक मान्यता दिली. यास्तव प्रस्तुत योजनेचा आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

मौजे मौदा(ता.मौदा,जि.नागपूर) या नळ पाणी पुरवठा योजनेच्या **रु.१९,३६,३०,०००/- (ढोबळ) (अक्षरी रुपये एकोणीस कोटी छत्तीस लक्ष तीस हजार फक्त)**

(अधीक लावलेले ई.टी.पी.चार्जेस रु.०.३६ लक्ष, आकस्मिकता निधी ५% रु.२.९१ लक्ष, व आस्थापना खर्च रु.१.२२ लक्ष ई.टी.पी.चार्जेस मध्ये समाविष्ट असल्याने एकूण रु.४.४९ लक्ष वगळून) एवढ्या सुधारित किंमतीच्या अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधिन राहून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी

१. उपरोक्त नमुद सुधारित किंमतीत योजनेची उर्वरित कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ३ महिन्यात पूर्ण करावीत. तद्नंतर योजनेचे लेखे बंद करण्यात यावेत.

२. या योजनेच्या मुळ प्रशासकीय मान्यतेचे आदेश व सुधारीत तांत्रिक मान्यतेच्या आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३. ही योजना पूर्ण झाल्यावर ती संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात यावी. संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर यांच्याकडून योजना प्रत्यक्षात पूर्ण झाली आहे, या आशयाची सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत योजना ताब्यात घेण्यास संबंधीत ग्रामपंचायत/जिल्हा परिषद जबाबदार राहील. योजना प्रत्यक्षात पूर्ण झाल्यावर लगेच संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नागपूर व संबंधित ग्रामपंचायतचे अधिकारी यांनी योजनेची संयुक्तपणे पाहणी आयोजित करावी आणि अशा पाहणीत कोणतेही दोष आढळून आल्यास योजना ताब्यात देण्यापूर्वी ते सुधारण्यात यावेत.

४. ही योजना राबविणे, त्याचे परिरक्षण, दुरुस्त्या (विशेष दुरुस्त्या धरुन) या साठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/संबंधित ग्रामपंचायत/जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणतीही मदत मिळणार नाही.

५. सदर योजना पुर्ण झाल्यावर स्थानिक स्वराज्य संस्थेने (संबधित ग्रामपंचायत/ जिल्हा परिषद) योजना हंस्तातरित करुन घेणे बंधनकारक राहील.

६. सन २०१३ मधील CAG च्या अहवालानुसार राज्यातील २१% पाणी पुरवठा योजना या देखभाल दुरुस्ती अभावी व विज देयके न भरल्यामुळे (Poor maintenance/Non Payment of electricity bill) बंद पडल्या असल्याचे दिसून येते त्यामुळे सदर योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्याच्या दृष्टीने पाणीपट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार व

वेळोवेळी वाढ करण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायत/जिल्हा परिषद यांची राहील.

७. प्रस्तुत योजना कोणत्याही परिस्थितीत पुनर्सुधारीत केली जाणार नाही याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील.

८. हगणदारीबाबतच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. या योजनेच्या सुधारित किंमतीतील वाढीव खर्च **रु.४,८४,३४,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी चौऱ्याऐंशी लक्ष चौतीस हजार फक्त)** हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा खालील राज्य हिश्श्यातून /जिल्हा नियोजन मंडळाकडून /किमान गरजा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात यावा.

३. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७१/१४४३, दिनांक ०५/०८/२०१५ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ ४/व्यय-३,दि.१४/०१/२०१६ अन्वये मिळालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१४०६१३८२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Deoram Ambekar

Digitally signed by Suresh Deoram Ambekar
DN: CN = Suresh Deoram Ambekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Desk Officer
Date: 2016.02.05 10:38:24 +05'30'

(सु.दे.आंबेकर)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
२) मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
३) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
४) जिल्हाधिकारी, नागपूर.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
६) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
७) महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई
८) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर.
९) संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.

१०) उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर
११) वरिष्ट भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर.
१०) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नागपूर
११) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.
१२) अतिरिक्त मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१३) अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३) मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१४) कक्ष अधिकारी (कार्या-१४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कक्ष अधिकारी (व्यय-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) कार्यासने (पापु-०४,०५, ृ०६,०७,०९,१०,१७,१८ व २०), पा. पु. व स्व. वि.मंत्रालय,मुंबई-३२.
१५) निवडनस्ती कार्यासन पापु-१३.